म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा. वा
दा. क्र. ८४५८९

# चला परत खेड्यात

BVBK-0404541

व्य.रा. खडांबीकर



खूप वाचा
खूप शिका

...७...

# चला परत खेड्यांत

BVBK-0404541

त्र्यं. रा. खंडाळीकर

नों. दि.

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य सहा आणे

## अनुक्रमणिका

१. यशवंता खेडें सोडतो
३

२. मुंबईची बातमी
१०

३. काळावर मात
२१

४. परत खेड्याकडे
२८

---

चित्रकार
शंतनु माळी

ब्लॉक्स
कर्नाटक प्रोसेस स्टुडिओ

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
के. भि. ढवळे
कर्नाटक हाउस
चिराबाजार, मुंबई २

पहिली आवृत्ति : १९५४

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन



यशवंता

# यशवंता

## खेडें सोडतो

यशवंता शेतांतून फेरा करून वस्तीवर आला. त्याची चाहूल लागतांच गोठ्यांतील जनावरें हंबरलीं. तो गोठ्यांत गेला. त्याचा धाकटा भाऊ रंगा, एका बैलाचा कंडा धरून त्याचें मस्तक खाजवीत होता. त्यानें जनावरें नुकतींच हिंडवून आणून बांधलीं होतीं. वैरणीच्या आशेनें जनावरें दावणींतील माती हुंगत होतीं. वैरणीचा एक बुडखाही त्यांत कोठें नव्हता. रंगाचे डोळे पाण्यानें भरले होते.

" लवकर आलास ? " यशवंतानें त्याला विचारलें.

" चारायला काय आहे कुठें ? लिंबाचा पाला घातला नि पाणी पाजून आणून बांधलीं. आग पडेल त्यांच्या पोटांत रोजरोज असला पाला खाऊन ! " रंगा आपले डोळे पुशीत म्हणाला. यशवंताही गहिंवरला.

गोठ्यांत दोन बैल, एक गाय, तिची बडदी कालवड आणि तीनचार महिन्यांचा तान्हा खोंड एवढीं त्यांचीं जनावरें होतीं. त्या सगळ्याच जनावरांचीं नुसतीं हाडें-कातडीं उरलीं होतीं. कडब्याचें एक धाट कीं गवताची काडी त्यांच्याकडे नव्हती. मळ्यांत कोठें वैरण करावी तर विहिरीला पाणी नव्हतें. सगळा पावसाळा कोरडा गेला होता. जमिनीला मोठमोठ्या भेगा पडल्या होत्या. ओढ्याचें पाणी उन्हाळ्याच्या सुरवातीलाच आटलें होतें. विहिरी कोरड्या पडत चालल्या होत्या.

पावसाळा केव्हांच संपून गेला होता. आकाशांत कोठें थोडेसे ढग आलें कीं शेतकरी आशेनें तिकडे पाहूं लागत. पावसाला प्रार्थना करीत, " ये बाबा एकदा. जोरांत पड. आमची राहिली, जनावरांची तरी दया येऊं दे जरा ! " पण ढग नुसते येत नि जात. चंद्रानें तळें केलं, उगवतीला वीज झाली अगर आभाळाच्या तळांतनें कोकण्या (दाट काळे ढग) उठल्या कीं शेतकरी एकमेकांना आनंदानें म्हणत, " आतां पाऊस येणार ! " पण कोठलें आलेंय् ! ते भटाला विचारीत, " पंचागणांत बगूनशान सांगा की देवा, पाऊस कधीं यायचा तें ! " " पडेल, पडेल ! " असें भटजी म्हणत. पण पाऊस पडत नव्हता. तिथल्या शिदोबाच्या जत्रेच्या वेळीं पुजाऱ्यानें अंगांत आणून भाकणूक केली होती, " सटवण (चंपाषष्ठीच्या वेळचा

१७०८८
८३३
८।१०।५८



यशवंताचा भाऊ रंगा

पाऊस) पडणार!" पण सटवणही पडलें नव्हतें. ज्या कांहीं विहिरींना थोडें फार पाणी होतें तेथें थोडेंसें हिरवें पीक दिसे. बाकीच्या जमिनी काळ्या पडल्या होत्या. शेतकरी आपलीं जनावरें मातीमोलानें विकत होते. जनावरें वैरणीवांचून मरूं लागलीं होतीं. काळ मोठा वाईट आला होता.

यशवंतानें आपल्या जनावरांकडे एकदा डोळे भरून पाहिलें. त्याला फार दुःख वाटलें. तो रंगाला म्हणाला, "आतां जनावरं ठेवायला नकोत. उद्यां बैल बाजाराला नेतों. गाय नि कालवड कुणी सांभाळीत असेल तर फुकट देऊन टाकतों."

"काय, बैल बाजाराला नेणार? बैल म्हणजे आपली चालती लक्ष्मी! ही अवदशा कां आठवली तुला? मला तरी कशाला ठेवतोस? वीक मलाही! घरांत धान्य तरी कुठें आहे?" रंगा खेदानें म्हणाला.

" वेडा तर नाहींस रंगा तूं ? मी कसाई नाहीं ! शेतकऱ्याचाच बच्चा आहें ! पण काळापुढें कांहीं इलाज आहे का ? चारदोन दिवसांत जनावरं बसतील. मग पाय खोडून मरतील. तशीं मारायचीत तीं तुला ? " यशवंता हुंदके देत म्हणाला. रंगा थोडा वेळ कांहींच बोलला नाहीं. त्यानें नंतर विचारलें, " बैल विकून काय करणार आहेस मग ? "

" जायचं कुठें तरी जगायला ! " यशवंतानें उत्तर दिलें.

" म्हणजे, गांव सोडणार ? तूं वाटेल तें कर. आम्ही कांहीं गांव सोडणार नाहीं. " रंगा चिडून म्हणाला.

" तुम्ही कुणी येणार नसाल तर मी एकटा मुंबईला जाईन. आपल्या इथला राजा कोळी तिथें एका गिरणींत कामाला आहे. तो परवां आला होता. तुलाही नोकरी लागेल तिथें, असं तो मला म्हणाला होता. मला रोज दोन रुपये तरी मिळतील. महिन्याला साठ सत्तर पगार पडेल. पंचवीस-तीस रुपयांत माझं भागवीन. बाकीचे तुम्हांला पाठवीत जाईन. " यशवंतानें खुलासा केला.

त्यावर रंगानें आपलें मत दिलें, " आपल्याला कांहीं पटत नाहीं हें. तूं जाऊं नयेस आणि कुणीच गांव सोडूं नये, असं मला वाटतं. "

रंगा रात्रीच्या शाळेला जात असे. त्या दिवशीं तो गेला नाहीं. रात्रीं त्यानें जेवण केलें नाहीं. त्याला झोपही लागली नाहीं. तो नुसता अंथरुणावर पडून होता. बैल विकल्यावर आपल्या जनावरांच्या गोठ्याला अवकळा येणार, ह्या विचारानें त्याला भडभडून येत होतें. अधूनमधून तो हुंदके देत होता. त्याच्या आईचें तिकडे लक्ष गेलें. ती त्याच्याजवळ गेली. तिनें त्याला विचारलें, " काय रे रंगा ? "



दलाल

यशवंता सायंकाळीं काय बोलला तें रंगानें तिला सांगितलें. तें ऐकून त्याची आई त्याच्या गळां पडून रडली.

सकाळीं यशवंताच्या बायकोला तें कळलें. मी बैल विकूं देणार नाहीं, असा तिनं हट्ट धरला. यशवंतानें सगळ्यांची समजूत घातली. बाजाराला जायची वेळ होतांच तो बैल घेऊन निघाला. सगळीं रडूं लागलीं.

बाजारच्या वाटेनें जनावरांच्या रांगा लागलेल्या होत्या. जनावरें घेऊन कोठें तरी जगायला निघालेले खेड्यांतले लोकही वाटेंत गांठ पडत होते. रोड जनावरें आणि दुःखी चेहेऱ्याचे ते लोक पाहून यशवंताच्या अंगावर शहारे आले.

बाजार जनावरांनीं गच्च भरला होता. खाटीक आणि दलाल त्यांतून हिंडत होते. शेळ्या-मेंढ्या ‘बँ ऽऽऽ’ असा काळीज

कापायला लावणारा आवाज काढून ओरडत होत्या. जागजागीं खाटकांनीं मेखांना दोर बांधून दावणी तयार केल्या होत्या. खरेदी केलेल्या शेळ्यामेंढ्या ते त्यांना नेऊन बांधीत होते. तें सारें पाहून यशवंताचें मन चरकलं. तो भांबावला. त्याच्याच गांवच्या जनावरांच्या एका दलालाला त्यानं बैल चाळीस रुपायांना विकले. तो दुःखी मनानं घरीं परतला.

वाटेंत त्याच्या गांवचे पाटील त्याला भेटले. आपली गाय आणि कालवड सांभाळाल काय म्हणून त्यानें त्यांना विचारलें. खोंडासह देणार असशील तर सांभाळतों, अशी पाटलांनीं अट घातली. यशवंतानें तें कबूल केलें. तो वस्तीवर गेल्यावर थोड्याच वेळांत पाटलांचा गडी आला. यशवंतानें आपली गाय आणि कालवड सोडली. घरांतल्या सगळ्यांनीं आकांत मांडला. यशवंताच्या एका लहान मुलानें खोंडाच्या गळ्याला मिठी मारली. त्यानें त्याची समजूत घातली; पण त्यानें मिठी सोडली नाहीं. शेवटीं त्याला बाजूला सारून त्यानें तीं जनावरें त्या गड्याच्या स्वाधीन केलीं. तो गडी तीं घेऊन गेला. जनावरांच्या रिकाम्या गोठ्याकडे पाहून यशवंतासही रडूं कोसळलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं यशवंतानें मुंबईला जायची तयारी केली. "आपलं खेडं सोडून कुठें निघालास? हीं कांहीं मर्दाचीं कामं नव्हत! धीर धरला पाहिजे! कंबर कसली पाहिजे!" असें त्याची आई त्याला परोपरीनें समजावीत होती. रंगा त्याला विनवीत होता, "आईचं तरी ऐक दादा, जाऊं नकोस!" त्याच्या बायकोला तर फारच दुःख झालें होतें. "तुम्ही जाऊं नका!" असें ती त्याला सारखें कळवळून म्हणत होती. त्या कोणाचेंच त्यानें मानलें नाहीं. तो निर्धारानें म्हणाला, "मी जाणारच. घरांत आतां थोडंसंच धान्य



पाटील

आहे. रोजगारधंदाही इथें मिळायचा नाहीं. उपाशी मरावं लागेल सगळ्यांनाच ! मी कांहीं माझ्याकरतां जात नाहीं. तुमच्याकरतां जातों. पुढच्या सालीं पाऊस चांगला झालेला कळलं कीं लागलीच येईन. ”

आईनें फडक्यांत बांधून दिलेल्या भाकरी धोतरांत गुंडाळून घेऊन यशवंता जायला निघाला. बैल विकून आलेल्या पैशांपैकीं वीस रुपये त्यानें रंगाला दिले. उरलेले त्यानें आपल्या खर्चाकरतां घेतले होते. आपल्या मुलांना उचलून घेऊन त्यानें त्यांचे मुके घेतले. “ सांभाळ सगळ्यांना ! ” असं म्हणत तो रंगाला कडकडून भेटला. त्यानें आईला मिठी मारली. “ बरं आहे येतों मी ! ” असें म्हणून त्यानें बायकोचा निरोप घेतला. सगळ्यांचेच कंठ दाटून आले होते. त्यांच्या डोळ्यांना धारा लागल्या होत्या. यशवंतानें स्टेशनचा रस्ता सुधारला.



गुरुजी

# मुंबईची

# बातमी

यशवंता गेला त्या दिवशीं रंगाला दिवसभर चैन पडलें नाहीं. काम कोठें लागलें नाहीं तर काय करायचं? अशी त्याला काळजी लागून राहिली होती. " आपणही दादाबरोबर गेलों असतों तर ? " हा विचार त्याच्या मनांत वरचेवर येत होता. पण आपलें खेडें आणि शेती सोडून जाणें त्याला कसेसेंच वाटलें होतें. रात्रीं आपल्या जनावरांच्या रिकाम्या गोठ्याकडे उदासपणें पाहात तो गोठ्यापुढील पटांगणांत बसला होता. त्याच्या मनांत तेच तेच विचार येत होते.



यशवंताची आई

इतक्यांत रात्रीच्या शाळेची घंटा त्याच्या कानांवर आली. तो नियमितपणें त्या शाळेला जात असे. फक्त आदल्याच दिवशीं त्याची शाळा चुकली होती. "काय करायचंय् आतां शाळेला जाऊन तरी !" असं त्याला प्रथम वाटलें. पण त्याचें मन त्याला तिकडे ओढूं लागलें. तो लगबगीनें उठला. शाळेला जाऊन येतों, असें त्यानें आईला सांगितलें. तो तिकडे जायला निघाला.

गांवांतल्या एका देवळांत ती रात्रीची शाळा भरत होती. तेथल्याच एका शेतकऱ्याचा मुलगा शिक्षण संपवून गांवीं राहायला आला होता. तो चांगला शिकलेला होता. त्याला नोकरी सहज मिळाली असती. पण खेड्यांतील मजूर-शेतकरी-वर्गाविषयीं त्याला फार जिव्हाळा वाटत होता. त्यांच्या कल्याणासाठीं आपल्या शिक्षणाचा – ज्ञानाचा उपयोग करायचा आणि नमुनेदार शेती करायची, असें त्यानें ठरविलें होतें. चार महिन्यांपूर्वीं त्यानें ती शाळा

सुरू केली होती. दिवसभर तो शेतांत काम करी, रात्रीं शाळा चालवी. शाळेंत येणारांना तो नुसतें लिहा-वाचायलाच शिकवीत नसे. स्वच्छता कां आणि कशी ठेवावी, जास्तींत जास्त मेहनत करून काळजीनें शेती करणें कसें फायद्याचें होतें, प्रेमानें आणि एकजुटीनें वागणें आपल्या आणि समाजाच्या कसें हिताचें आहे, हेंही तो त्यांना समजावून सांगत असे. तो त्यांना वर्तमानपत्रें, पुस्तकें, लेख वाचून दाखवी. मनोरंजक गोष्टी सांगून त्यांची करमणूक करी. त्यामुळें गांवांतील लिहितां-वाचतां न येणारे बरेच जण शाळेला येऊं लागले होते. ते सारे त्याला गुरुजी म्हणत. अलीकडे दुष्काळामुळें शाळेला येणारांची संख्या कमी होत चालली होती.

रंगा शाळेंत पोचला. गुरुजींनीं नुकतीच शिकवायला सुरुवात केली होती. रंगाला पाहातांच ते थांबले. त्यांनीं त्याला विचारलें,– “ काय रे रंगा, तुझ्या भावानं बैल विकले म्हणे ? आणि तो कुठें मुंबईला गेला म्हणे काम पाहायला ? ”

“ होय ! ” रंगा आपल्या जागेवर जाऊन बसत, खालीं मान घालून म्हणाला.

“ केवढा अविचार केला त्यानें हा ! तूं त्याला सांगयचं नाहींस का, असं करूं नकोस म्हणून ? ” गुरुजी हळहळून म्हणाले.

“ मीं खूप सांगितलें. त्यानें ऐकलं नाहीं. त्याचंही बरोबर होतं. जनावरांना वैरण नव्हती. तीं वांचलीं नसतीं. इथें आतां रोजगारही लागत नाहीं. माणसांनाही उपाशी मरावं लागलं असतं ! ” रंगानें खुलासा केला.

“ इतके दिवस काढले तसे आणखी चारआठ दिवस काढतां आले नसते का? दोनतीन दिवसांत बांडिंगचीं कामं सरकार सुरू करणार आहे. जनावरांकरतां गवताच्या गांठी, पेंड सरकारकडून सवलतीनें दिली जाणार आहे. कुणी गांव सोडूं नये, जनावरं विकूं नयेत, अशी आज सकाळीं दवंडी झाली. तें कळलं नाहीं का तुला? काळ कांहीं नेहमीं असाच राहिला नसता. कुठल्याही संकटाला तोंड द्यायची तयारी ठेवायला नको का? आपला देश आतां स्वतंत्र झाला आहे. आपण निवडून दिलेले आपले लोकच राज्यकारभार चालवीत आहेत. सरकार आतां आपलं आहे. तें आपल्या परीनें आपल्याला मदत करीत आहेच. करीलही. पण आपणही कांहीं करायला नको का? जागे होऊं या. एकमेकांच्या कल्याणाकरतां एक होऊन कष्ट करूं या. ह्यांत माणुसकी आहे. माणुसकी हाच खरा धर्म! तो धर्म पाळला तर आपलं, आपल्या देशाचं भलं होईल. काळावर मात करतां येईल. आपल्यापैकीं बऱ्याच जणांच्या विहिरींचं पाणी आटलंय्. त्यांतला गाळ काढला, घोबी सवाळून घेतली, तर थोडं तरी पाणी लागेल. पैशाच्या अभावीं हीं कामं अडून राहिलेलीं आहेत. आपण तीं आळीपाळीनें एकमेकांकरतां करूं या. विहिरींना पाणी लागलं तर मका, कडवळ असल्या वैरणी करतां येतील. ह्या वैरणी दीड-दोन महिन्यांत घालायला येतात. तंवर सवलतीनें मिळणारं सरकारी गवत मिळवून जनावरांना घालावं. जनावरं पिंपळाचा पाला खातात. आपल्या गांवच्या शिवारांत पिंपळाचीं दहाबारा मोठालीं झाडं आहेत. त्यांच्या पाल्याचा उपयोग करतां येईल. हें सगळं करून मृगापर्यंत आपल्याला जनावरं सहज

तगवतां येतील. सरकारी बांडिंगचीं कामं सुरू झालीं म्हणजे सगळ्यांनाच काम मिळेल. सरकारी दुकानांतून धान्य मिळेल. माणसं जगवितां येतील. जनावरं विकून आणि गांव सोडून आपला निभाव लागणार नाहीं ! आपण दुबळे, भेकड राहिलों तर आपलं सरकार तरी कसं समर्थ राहील ? मग आपल्या स्वातंत्र्याचा काय उपयोग ? तें कसं टिकेल ? आपण एक होऊन समर्थ होऊं या ! " गुरुजी तळमळीनें म्हणाले. त्यांनीं मग रंगाला विचारलें, " काय रे रंगा, तुझ्या विहिरीला पाणी आहे का ? "

" नाहीं ! आम्हीं प्यायचं पाणी सुद्धा दुसरीकडून आणतों. " रंगानें उत्तर दिलें.

" मग चला उद्यांपासून आपण रंगाच्या विहिरींतला गाळ काढायला लागूं या. खोरीं, पाट्या आपआपल्या घेऊन जायचं. कोण कोण तयार आहे ? " गुरुजींनीं सगळ्यांना सवाल केला. सगळ्यांनीं तयारी दाखविली.

" पण गुरुजी, रंगाजवळ आतां बैल नाहींत. पाणी लागलं तरी त्याला त्याचा काय उपयोग ? " एकानें शंका काढली. त्यावर गुरुजी म्हणाले, " आपल्यापैकीं दुसऱ्या कुणाला तरी त्याचा उपयोग होईल. कुणी कांहीं त्याची विहीर नि जमीन नेणार नाहीं ! " आणि त्यांनीं रंगाला विचारलं, " काय रे रंगा ? "

" माझी कसलीच हरकत नाहीं. मला उलट आनंद वाटेल. " रंगा म्हणाला.

तो बेत नक्की झाला.

गुरुजींनीं मग रोजच्यासारखं शिकवलं आणि शाळा सोडली. त्यांच्या त्या बोलण्यानें सर्वांनाच चेतना मिळाली होती. रंगालाही उत्साह वाटूं लागला होता. पण सकाळीं गांवांत झालेली दवंडी आपल्याला कळली असती, तर यशवंतदादाला आपण जाऊं दिलें नसतें, अशी त्याला हळहळही वाटत होती. शाळा सुटल्यावर तो तालमीकडे गेला. त्यानें तालमींतले आपले सगळे दोस्त गोळा केले आणि त्यांना तो म्हणाला,

" उद्यां गुरुजी रात्रीच्या शाळेंत येत असलेल्यांना घेऊन आमच्या विहिरींतला गाळ काढायला येणार आहेत. तुम्ही या सवड असली तर. "

त्यांनीं कबूल केलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं पंचवीस तीस तरुण खोरीं, पाट्या घेऊन रंगाच्या वस्तीवर गोळा झाले. गुरुजीही आले होते. रंग त्यांना विहिरीकडे घेऊन गेला. विहिरीच्या तळापासून टोकापर्यंत त्यांनीं रांग लावली. गुरुजीही तींत उभे होते. रंगानें आपल्या दोघां-तिघां मित्रांना बरोबर घेऊन गाळ भरून द्यायला सुरुवात केली. गाळ भराभर वर येऊन पडूं लागला. दोन दिवस तें काम चाललें होतें. गाळ खरडून निघाल्यावर पाझर मोकळे झाले. पाणी पाझरूं लागलें. त्यांनीं मग लांब पाहारा आणून घोबी सवाळलीं. एका घोब्यांत दहा-बारा हात पाहार बुडली गेल्यावर, त्यांतून कारंजासारखें पाणी उफाळूं लागलें. तें पाहून रंगाचा ऊर आनंदानें भरून आला. इतरांनाही आनंद झाला.

ती बातमी गांवभर पसरली. लोकांना आश्चर्य आणि कौतुक वाटूं लागलें. गुरुजींविषयींचा त्यांचा आदर वाढला. त्या दिवशीं रात्रीची

शाळा सुरू झाल्यावर गुरुजी म्हणाले, "आपल्या प्रयत्नाला यश आलं. आपल्या सोयीप्रमाणें आळीपाळीनें आपण आणखी कांहीं विहिरींतील गाळ काढून देऊं. रंगाच्या मळ्यांत कुणी तरी आतां लवकर वैरण करा."

"कुणी तरी कशाला पाहिजे? त्याचे बैल आहेत अजून दलाला-जवळच. त्याला ते पैसे देऊन परत घ्यायला सांगा. आपण त्याला द्यायला लावूं!" एकजण मध्येंच म्हणाला. गुरुजींनीं रंगाला विचारलें, "होय रे रंगा? मग घेतोस का बैल परत? पैशाची सोय होईल का?" रंगा लागलीच म्हणाला, "मला ठाऊक नव्हतं. मी तयार आहें. पैशाची सोय करतों." त्याचा चेहेरा आनंदानें फुलला होता.

शाळा सुटल्यावर गुरुजी, रंगा आणि इतर दहा-बारा जण मिळून त्या दलालाच्या घराकडे गेले. त्याच्या दारांत त्यानें खरेदी केलेल्या जनावरांची दावण होती, त्यांत रंगाचे बैल होते. त्याला पाहातांच ते हंबरले. रंगाच्या अंगावर कांटा आला. दलाल पांच रुपये जास्त घेऊन बैल द्यायला तयार झाला. उद्यां पैसे घेऊन येऊन बैल घेऊन जातों, असें रंगानें त्याला सांगितलें. नंतर तो आपल्या वस्तीवर गेला. आपल्या आईला आणि भावजयीला त्यानें तें सांगितलें. त्यांना आनंद झाला. त्याची आई त्याला म्हणाली, "पण पैशाचं काय करणार आहेस?"

"दादानें जातांना दिलेले वीस रुपये आहेत. वठायला झालेलीं तीनचार झाडं आहेत तीं विकावीं. आणखी कांहीं घरांतलं विकूं. शंभर रुपये गोळा होतील. त्यांतले बैलाचे देऊन राहातील त्याच्या गवताच्या गांठी आणाव्यात. सोसायटीकडं त्या आल्या आहेत म्हणे.

पाटलांनीं नेलेलीं आपलीं जनावरं परत दिलीं तर तींही आणावीं म्हणतों. बघतों विचारून. " रंगानें खुलासा केला.

" तींही आणा दिलीं तर. मी माझ्या पोराचे चांदीचे दागिने देतें. ते विका. दहावीस रुपये येतील. तेवढेच आणखी होतील. " रंगाची भावजय मध्येंच म्हणाली.

" तें होईल कसंही. पण एवढं करून काय जनावरं जगतील ? आपण काय करायचं ? घरांतलं धान्य फार तर दहा-पंधरा दिवस टिकेल. " त्याच्या आईनें विचारलें.

" बंडिंगचीं सरकारीं कामं सुरू होणार आहेत लवकरच. मी जात जाईन. त्याच्यावर चालेल आपलं ! " रंगानें उत्तर दिलें.

" विहिरीला पाणी आलंय्, त्याचं काय करणार ? " आईनें आणखी विचारलें.

" पहांटे रात्रीं शेतीचं काम करीत जाईन. मोट हाकीन आणि त्या कामालाही जात जाईन. " रंगानं ठरविलेलं तिला सांगितलें. त्यावर त्याची भावजय म्हणाली,

" मोट तुम्ही हाकायला नको. मला शिकवा. मी हाकीन. आत्या दारं धरतील. कुळवणी पेरणी तेवढी तुम्ही करत जा म्हणजे झालं. "

दुसऱ्या दिवशीं आगाऊ पन्नास रुपये घेऊन रंगानें झाडें विकलीं. भावजयीनें दिलेले मुलांचे दागिने आणि इतर कांहीं विकून पन्नास रुपये आले. दलालाला पैसे देऊन त्यानें बैल परत घेतले. बैल घेऊन तसाच तो पाटलांना भेटायला गेला. आमचीं जनावरें परत देत असाल तर मी नेऊन सांभाळतों, असें त्यानें पाटलांना सांगितलं.

पाटील लागलीच त्याला घेऊन आपल्या मळ्याकडे गेले. त्यांनीं त्याचीं जनावरें त्याच्या स्वाधीन केलीं. तीं आणि बैल घेऊन तो आपल्या वस्तीवर गेला. आपलीं जनावरें परत आलेलीं पाहून रंगाच्या आईला आणि भावजयीला फारच समाधान वाटलें. यशवंताचा मुलगा खोंडाला पाहून आनंदानें उड्या मारून नाचूं लागला. रंगाची भावजय कुंकवाचा करंडा आणि पाण्याचा तांब्या घेऊन आली. सगळ्याच जनावरांच्या पुढच्या पायांवर तिनें पाणी टाकलें. त्यांच्या पायां-कपाळांना कुंकू लावलें. बैलांच्या आणि खोंडाच्या पायांना सोनें लावलें. त्यांना भाकरीचे तुकडे चारले. रंगानें जनावरें गोठ्यांत नेऊन बांधलीं. गोठा गजबजला. वस्तीला शोभा आली. गवताच्या गांठी खरेदी करायला पुन्हा रंगा गांवांत गेला. चाळीस रुपयांच्या चार गांठी त्यानें खरेदी केल्या. त्या तो आपली बैलगाडी नेऊन घेऊन आला.

अजून बंडिंगच्या कामाला सुरुवात झाली नव्हती. आळीपाळीनें विहिरींतला गाळ काढण्याचें काम चाऊच होतें. रंगा त्याला नियमितपणें जात होता. सकाळ-संध्याकाळ मेहनत करून विहिरीजवळचं अस्सल बागाईत रान त्यानें तयार केलें. त्यांत कडवळ आणि मका लावली. तें रान लागोपाठ दोनदा भिजवून काढलें. विहिरीला छातीइतकें पाणी येत होतें. तें दररोज दोनदा मोटेनें काढून, त्यानें भिजेल तितकें रान तो भिजवीत होता. चौथ्या-पांचव्या दिवशीं कडवळाचे आणि मक्याचे कोंब अंकुरले. रानाला रोषणाई आली. रंगाचें मन हरकलें.

आठदहा दिवसांत इतर पांच-सहा विहिरींतील गाळ काढून झाला. त्यांतल्या तीन-चार विहिरींना चांगलें पाणी लागलें. त्यांच्या

मालकांनींही रंगासारख्याच वैरणी केल्या. त्यांचें पाहून गांवांतील इतर कांहीं लोकांनीं एकमेकांच्या मदतीनें तशींच कामें सुरू केलीं होतीं. गांवांत नवा उत्साह निर्माण झाला होता. लोकांचीं मनें जोडलीं जात होतीं.

रंगा नंतर बांडिंगच्या कामाला जाऊं लागला. त्याची भावजय त्याच्याकडून मोट हाकायला शिकली होती आणि त्याची आई मोट-दारें करीत. वैरणीचे मोड चांगले वाढत होते. त्यांची काळजी दूर होत चालली होती. यशवंता गेला म्हणून सर्वांनाच हळहळ वाटत होती. त्याची त्यांना सारखी आठवण होत होती.

रंगा रात्रीच्या शाळेला गेला असतां एक दिवस त्याला एक विलक्षण बातमी कळली. मुंबईला गिरणींत कामाला असलेल्या राजा कोळ्याचें त्याच्या घरीं पत्र आलें होतें. त्यांत त्यानें लिहिलें होतें, " आपल्या गांवचा यशवंता इथं आला होता. त्याला मीं गिरणींत काम लावून दिलें होतें. माझ्याकडेच तो उतरला होता. तो घरीं परतच आला नाहीं. खूप चौकशी केली. त्याचा तपास लागत नाहीं. गांवीं आला असला तर कळवा. दोन दिवसांपूर्वीं एक खेडुत ट्रामखालीं चेंगरून मेला अशी वर्तमानपत्रांत बातमी आली होती. तें कळल्यापासून मला काळजी वाटते आहे. " राजाच्या भावानें तें रंगाला सांगितलें. तें ऐकून रंगाला हातपाय गळल्यासारखेंच वाटलें. वस्तीवर जाऊन त्यानें ती बातमी आईला आणि भावजयीला सांगितली. " कशाला गेला होतास मुंबईला ? काय झालं असेल रे बाबा तुला ? " असें डोकें बडवून घेऊन म्हणत, त्याच्या आईनें हंबरडा फोडला. यशवंताच्या बायकोनं " कुठली मुंबई आठवली तुम्हांला !



यशवंताची मुलगी

आतां मी काय करूं ?" असं मोठमोठ्यानं रडून म्हणत एकच आकांत मांडला. "मी मुंबईला जाऊन येऊं का चौकशी करायला ?" रंगानें आईला विचारलें.

" तूं नको जाऊस बाबा ! तो गेला तेवढंच पुरे ! तूं जाशील तर मी धडक घेऊन प्राण देईन !" त्याची आई हुंदके देत म्हणाली. तर त्याची भावजय त्याला सारखी कळवळून म्हणत होती, " भाऊजी, जा तुम्ही ! बघा चौकशी करून कांहीं. तुम्हीं आपलीं जनावरं – आपलं धन परत मिळवलंत तसाच माझा धनी मिळवून आणा !"

' काय करावं ?' असें रंगाला कोडें पडलें.



यशवंताची बायको

# काळावर मात

रंगाजवळ वीस रुपये शिल्लक होते. ते बरोबर घेऊन पहाट होतांच तो गुरुजींकडे गेला. त्यानें ती हकीकत त्यांना सांगितली आणि तो म्हणाला, “ काय करावं ? मी जाऊन येऊं का मुंबईला ? पण तें मोठं शहर आहे ! मला तर कसलीच माहिती नाहीं ! ” त्यावर गुरुजी म्हणाले, “ मी जाऊन येतों. ” रंगानें त्यांच्या खर्चा-करतां आपल्याजवळचे वीस रुपये त्यांना दिले. त्यांनीं राजा कोळ्याचा

पत्ता त्याच्या घरून लिहून आणायला त्याला सांगितलें. त्यानें तो आणून दिला. त्याच दिवशीं गुरुजी मुंबईला गेले. रंगा, त्याची आई आणि भावजय ह्यांचे डोळे त्यांच्या वाटेकडे लागून राहिले होते.

दोन दिवसांनीं गुरुजी परत आले. त्यांनीं लागलीच रंगाला बोलावून घेऊन सांगितलें, " मी राजाला भेटलों. बऱ्याच गिरण्यांच्या कचेऱ्यांत जाऊन चौकशी केली. कांहीं कारखाने धुंडाळले. पण यशवंताचा तपास लागला नाहीं. मात्र तो जिवंत आहे खास! ट्रामखालीं चेंगरून मेलेल्या त्या इसमाची मीं माहिती काढली. तो मुंबईकडच्याच खेड्यांतला म्हातारा होता. यशवंता मुळींच नव्हता!" रंगाला तेवढेंच समाधान वाटलं. त्यानं वस्तीवर जाऊन आपल्या आईला आणि भावजयीला तें सांगितलें. त्यांना धीर आला.

मका आणि कडवळाचीं पिकें चांगलीं वाढत होतीं. जनावरांना गवताची वैरण होती. रंगा ती पुरवून घालीत होता. आठवड्यांतून दोन तीनदा सवड काढून तो त्यांच्याकरतां पिंपळाचा पालाही आणीत होता. तो रोज बंडिंगच्या कामाला जात असे. त्याचे आठवड्याला सहासात रुपये येत. घरांतलें धान्य संपलें होतें. त्याच्या पगारावर त्यांचें भागेना. रंगाची भावजयही मग त्याच्याबरोबर कामाला जाऊं लागली. त्यांना आठवड्याचे नऊ–दहा रुपये मिळूं लागले. त्याचा जम बसला. कामाला जाण्यापूर्वीं आणि कामावरून आल्यावर रंगा मोट हाकून विहिरींतलं पाणी काढी. त्याची भावजय दारं धरी. आई घरचें पाही. शनिवारीं काम बंद असे. त्या दिवशीं रंगा शेतांत कुळव हाणी. एवढें करूनही तो रात्रीची शाळा चुकूं देत नव्हता. दोन महिन्यांनीं वैरणी घालायला आल्या. त्यांतला कांहीं हिस्सा

गाळ काढायला आलेल्यांना त्यानें वांटून दिला. इतरांनींही तसेंच केलें. त्यामुळें बऱ्याच जणांची थोडी फार सोय झाली. पांचसहा महिन्यांचा काळ त्यांनीं असा चिकाटीनें काढला.

नंतर पावसाळा आला. आकाशांत ढग येऊं लागले. मृग नक्षत्र लागतांच दररोज कोठें तरी पाऊस उतरलेला दिसूं लागला. तिकडे बोट दाखवून शेतकरी आनंदानें एकमेकांना म्हणूं लागले, " तो पाहा तिकडे उतरला ! " एक दिवस तो त्यांच्याही गांवावर आला. अगदी जोराचा ! पाऊस पडूं लागतांच मातीचा वास दरवळला. थोड्याच वेळांत जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें. रानांतून पाणी निघालें. ओढे-नाले भरून आले. लागोपाठ असे तीनचार पाऊस पडले. धरणीची तहान भागली. शेतकऱ्यांनीं बाजरी वगैरे खरिपांची पेर सुरू केली. रंगानेंही ज्वारीकरतां पुरेसं रान ठेवून खरीपाची पेरणी सुरू केली.

रंगाला आतां साधारण लिहितां-वाचतां येऊं लागलें होतें. त्याचें मन शाळेकडे अधिक ओढलें जात होतें. गुरुजी त्यांना शाळेंत वरचेवर सांगत असत, " आपला देश, खेड्यांचा देश आहे. आपलीं खेडीं मागासलेलीं आहेत. आपली शेती मागासलेली आहे. जास्तींत जास्त कष्ट करून आपण तीं सुधारलीं पाहिजेत. आपली लोकसंख्या सारखी वाढत आहे. धान्य मात्र आपण पूर्वींइतकंच पिकवतों. तें आपल्याला कसं पुरेल ? तें खायलाच पुरलं नाहीं तर आपल्या इतर नडी कशा भागतील ? शहरांतील लोकांना तें आपल्याला कसं पुरवतां येईल ? आपण जास्तींत जास्त कष्ट केले, खत घातलं, पिकांची नीट काळजी घेतली, तर कितीतरी

पटीनें धान्य वाढेल. आपण तसं केलं पाहिजे !"

रंगा तें लक्ष देऊन ऐकत असे. आपण जास्तींत जास्त धान्य पिकवायचें, असा त्यानें निर्धार केला होता. गुरुजींनीं खताचे खड्डे कसे तयार करावेत तें त्यांना सांगितलें होतें. त्यानें दोन-तीन खड्डे खणून ते तसे भरले होते. शाळेंत एक दिवस गुरुजींनीं जपानमध्यें भाताचें पीक कसें काढतात ती माहिती दिली. सरकारनें शेतकऱ्यांकरितां त्या माहितीचीं पुस्तकें छापून गांवोगांव पाठविलीं होतीं. गुरुजींनीं तें पुस्तक त्यांना वाचून दाखविलें. रंगानें तें त्यांच्याकडून मागून आणलें. अडखळत तीनचारदा वाचून काढलें. त्यांच्या भागांत भाताचें पीक थोडें फार करीत असत. रंगाच्या शेतांत एका तालीच्या पोटांत तें पीक येत असे. त्यानें तें पीक तेथें तशा रीतीनें काढायचें ठरविलें. त्यानें भाताचें रोप टाकलें. गुरुजींकडून पैसे उसने घेऊन खत टाकलें. रोप आणलें. रोप लावायला येतांच त्यानें तें लावून काढलें. तें चांगलें लागून निघाल्यावर त्यानं खत घातलं. त्याची तो जास्तींत जास्त काळजी घेत होता. तें पीक फारच जोमांत वाढत होतें. बंडिंगचीं कामें आतां बंद झालीं होतीं. गांवांतच इतर शेतमजुरीचीं कामें मिळूं लागलीं होतीं. घरच्या शेतीचीं कामें पाहात रंगा आणि त्याची भावजय त्या कामाला जात असत.

अडीच तीन महिन्यांनीं बाजरीचें पीक आलें. रंगाची दहा पोतीं बाजरी झाली. त्यांची धान्याची काळजी दूर झाली. रंगानें मजुरीच्या कामाला जायचें बंद केलें. ज्वारीच्या पेरणीचे दिवस आले होते. त्यानें त्याकरतां राखून ठेवलेल्या जमिनीची खूपच मेहनत केली होती. दरसाल ते

फार तर तीन कुळवाच्या पाळ्या घालीत. यंदा त्यानें पांच-सहा पाळ्या घातल्या होत्या. त्यांतलें एकरभर चांगलें रान तर त्यानें सात-आठ वेळां कुळवलें होतें. पूर्वा नक्षत्राचाही चांगला पाऊस झाला. वापसा चांगला साधून रंगानें ज्वारी पेरली. जास्त मेहनत केलेल्या एकरांत त्यानें पुरेसें अंतर राखून ज्वारी टोचून लावून घेतली. त्याकरतां गंधक लावलेलें निवडक बीं त्यानें वापरलें होतें.

दिवाळीच्या सुमाराला भाताचें पीक कापायला आलें. तें कापून घेऊन त्यानें भात तयार केलें. पंचवीस पोतीं भात झालें. त्या रानांत आठ-नऊ पोत्यांपेक्षां अधिक भात कधीं झालें नव्हतें. त्याला फार आनंद झाला. " काळावर मात केलीस बाबा ! " असें समाधानानें म्हणून त्याच्या आईनें त्याची पाठ थोपटली.

घरखर्चाकरतां दोन तीन पोतीं ठेवून घेऊन त्यानें बाकीचें भात विकलें. त्याचे जवळजवळ चारशें रुपये आले. खताकरतां गुरुजीं-कडून उसने आणलेले पैसे त्यानें परत नेऊन दिले. पन्नास रुपयांच्या कोंबड्या खरेदी केल्या. नंतर चांगल्या पैदाशीच्या कोंबड्यांचीं साठ अंडीं त्यानें विकत आणलीं. त्यानें आणलेल्या कोंबड्यांपैकीं चार खुडुक कोंबड्या त्यानें तीं अंडीं उबवायला बसविल्या. जनावरांच्या गोठ्याचें मोडकें छप्पर काढून त्यानें तेथें पत्रे टाकून घेतले. त्याकरतां दीडशें रुपये खर्च केले.

गुरुजींच्या शिकवणीमुळें आपणाला हें सगळं करतां आलें ह्याची रंगाला जाणीव होती. आपण वर्गणी गोळा करून शाळेकरतां इमारत बांधूं, असें गुरुजी म्हणत असत. रंगानें त्याकरतां पन्नास रुपये दिले. गुरुजींनीं आणि शाळेंत येणाऱ्या इतरांनीं मग वर्गणी

गोळा करायला सुरुवात केली. गांवांतील लोकांनीं आनंदानें मदत केली. महिन्याभरांत दोन हजार रुपये जमले. तितकीच सरकारी मदत मिळाली. शाळेच्या बांधकामाला सुरुवात झाली.

मांगवाड्यांतील मांगांचीं घरें कोंबड्यांच्या खुराड्यांसारखीं होतीं. गुरुजींनीं त्यांच्याकरतां गांवठाणांतील मोकळी जागा मिळविली. पंचांची आणि गांवकऱ्यांची मदत घेतली. त्यांना हवेशीर छपरी घरें बांधून दिलीं.

लोक गुरुजी सांगतील तें ऐकत होते. त्यांनीं गांवांतील रस्ते दुरुस्त केले. गांवांत स्वच्छता ठेवली. रंगा आणि त्याचे शाळेंतले व तालमींतील सोबती गुरुजींना त्यांच्या प्रत्येक कामांत मदत करीत.

आपलें ज्वारीचें पीक चांगलें आणण्याकरतां रंगा कसून प्रयत्न करीत होता. टोचून लावलेल्या एकरांतील तर ज्वारीच्या प्रत्येक धाटाची तो काळजी घेत होता. खड्ड्यांत तयार झालेलें खत त्यानें प्रत्येक धाटाला दोनतीनदा घातलें. दोनतीनदा भांगलण करून त्यानें त्यांच्या बुडांना माती लावून घेतली. रानांतील ओल कमी होऊं दिली नाहीं. तें पीक फारच चांगलें आलें. त्याला कोंबड्याएवढीं कणसें पडलीं. गांवांतील लोक तें पीक पाहायला येत होते. तें पाहून रंगाला ते शाबासकी देत होते. गुरुजींनींही तें येऊन पाहिलें. त्यांना फारच आनंद झाला. त्यांनीं सरकारनें लावलेल्या अधिक धान्य पिकविण्याच्या चढाओढींत त्याला भाग घ्यायला सांगितलें. त्याकरतां त्याचा फॉर्म भरून दिला. पैसे भरले.

रंगानें कोंबड्यांखालीं उबवायला ठेवलेल्या अंड्यांपैकीं एकही अंडें बाद झालें नव्हतें. सगळ्यांतून पिलें निघालीं होतीं. तीं



यशवंताचा मुलगा

आतां चार महिन्यांचीं झालीं होतीं. त्यांतले कांहीं नर रंगानें विकले. त्याचे वीस रुपये आले. अंडीं दररोज निघत होतीं. तीं तो विकत होता. ते पैसे त्यानें वेगळे सांठविले होते. सगळे मिळून सत्तर रुपये झाले. रंगानें त्याच्या तीन शेळ्या खरेदी केल्या. एक शेळी व्यायला झालेली होती. ती चारसहा दिवसांनीं व्याली. तिला दोन कोकरें झालीं.

त्यांना आतां कसलीच वाण नव्हती. मात्र दिवस अधिक जात होते तशी, 'यशवंता कुठें असेल? तो काय करीत असेल? तो परत कां येत नाहीं?' अशी त्यांना त्याची अधिक काळजी वाटूं लागली होती. त्याच्या आठवणीनें त्याच्या आईचे डोळे वरचेवर भरून येत. त्याची बायको खंगत चालली होती. यशवंताचा धाकटा मुलगा, "दादा कुठें आहे माझा? तो कधीं येणार?" असें दररोज विचारी. ते त्याची समजूत घालीत, "येणार आहे हं आतां!"



यशवंताचा मित्र राजा कोळी

# परत खेड्याकडे

यशवंता कधीं कोठल्याच शहराला गेलेला नव्हता. शहर कसें असतें, ह्याची त्याला कल्पना नव्हती. त्यानें राजा कोळ्याचा पत्ताही बरोबर घेतला नव्हता. तेथें गेल्यावर गिरणींत चौकशी करावी, असें त्यानें ठरविलें होतें. स्टेशनवर त्याला तीन-चार तास थांबावें लागलें. गाडी सुटल्याची घंटा होतांच तो तिकीट काढायला गेला. त्यानें मुंबईचें तिकीट मागितलें. मास्तरनीं त्याला विचारलें, “ कुठल्या स्टेशनचं ? ”



यशवंताचा नातलग बाळू जाधव

तो गोंधळला. मुंबईचीं कोणतीं स्टेशनें आहेत, तें मास्तरनीं त्याला समजावून सांगितलें आणि पुन्हा विचारलें, " कोणत्या स्टेशनचं देऊं ? " यशवंता म्हणाला, " नेमकं मुंबईत जातां येईल, असं मधल्या एका स्टेशनचं द्या ! " मास्तर हसले. त्यांनीं त्याला दादरचं तिकीट दिलें. गाडी आली. तो गाडींत बसला. रात्रीं अकरा वाजतां गाडी पुणें स्टेशनवर पोचली. त्यानें डब्यांतल्या लोकांना विचारलें, " मुंबई हीच का ? " ते हसून म्हणाले, " बैस. उजाडल्यावर तूं मुंबईला जाशील ! "

यशवंता सकाळीं दादर स्टेशनवर उतरला. सारख्या जात-येत असलेल्या लोकल गाड्या आणि जिकडे तिकडे माणसेंच माणसें पाहून तो घाबरला. गाडींतून उतरून निघालेल्या उतारूंच्या मागोमाग तो गेला. स्टेशनबाहेर गेल्यावर, कोठें जावें, तें त्याला सुचेना.

पाय नेतील तिकडे तो जात होता. उंच उंच इमारती आणि माणसांची व वाहनांची सारखी सुरू असलेली रहदारी पाहून तो भांबावला होता. चारपांच तास तो भटकत होता. वाटेंत तो लोकांना विचारी, " आमच्या इथला राजा कामाला जातो ती गिरणी कुणीकडे आहे हो ? " तें ऐकून लोक नुसते हसत. त्याला सपाटून भूक लागली होती. थोडें आडबाजूला जाऊन त्यानें आपल्या भाकरी सोडल्या. जेवण केलें. एका हॉटेलमध्यें जाऊन तो पाणी प्याला. नंतर त्यानें पुन्हा भटकायला सुरुवात केली. " राजा आपल्याला कसा भेटेल ? तो भेटला नाहीं तर कुठें जावं ? काय करावं ? " अशी त्याला काळजी लागून राहिली होती. चालून चालून तो थकला होता. सायंकाळच्या वेळेला तो एका हॉटेलांत पाणी प्यायला गेला. तेथें त्याला राजा दिसला. देव भेटल्यासारखा त्याला आनंद वाटला. राजा त्याला आपल्या घरीं घेऊन गेला. आपण कां आलोंत तें त्यानें राजाला सांगितलें.

दुसऱ्या दिवशीं राजानें त्याला त्याच्या गिरणींत काम मिळवून दिलें. गिरणी सुटल्यावर दोघे घरीं यायला निघाले. घर जवळ आलें होतें. राजा त्याला म्हणाला, " तूं आतां एकटा जाशील का ? पुढच्या चौकापर्यंत सरळ जा. नंतर उजवीकडे वळ. त्या रस्त्यालाच आपली चाळ आहे. मला थोडं काम आहे. मी तिकडे जाऊन येतों. आलोंच तुझ्या पाठोपाठ. " त्यावर " बरं ! " असें दबकत म्हणून यशवंतानें मान डोलावली. राजा दुसरीकडे वळला. यशवंता चौकापर्यंत सरळ गेला. तेथें तो गोंधळला आणि डावीकडे वळला. तो पांच सहा तास भटकत होता.

याला राजाची चाल सापडली नाहीं. त्याला आपल्या अडाणीपणाची शरम वाटूं लागली होती. त्याच्या पायाला गोळे येऊं लागले होते. एके ठिकाणीं रस्त्याच्या कडेला कांहीं लोक झोपलेले त्यानें पाहिले. तेथें जाऊन त्यानें आपलें अंग धरणीवर टाकलें. त्याला झोप लागली.

सकाळीं यशवंताला त्याचा एक दूरचा नातलग भेटला. तो तेथेंच कामाला होता. यशवंताला तें ठाऊक होतें. "आपल्या भागाला काळ पडलाय्. कांहींतरी काम मिळालं तर पाहावं म्हणून मी आलोंय्." असें त्यानें त्याला सांगितलें. आदल्या दिवशींची हकीकत त्यानें त्याला सांगितली नाहीं. त्याला त्यांत कमीपणा वाटत होता. त्याचा तो नातलग त्याला आपल्या घरीं घेऊन गेला. तो एका भांड्यांच्या कारखान्यांत कामाला होता. तेथेंच त्यानें त्याला काम लावून दिलें. त्यानें त्याला आपल्याकडेंच ठेवून घेतलें.

आपल्या त्या नातलगाबरोबर यशवंता दररोज कामाला जाऊं लागला. त्याला दरमहा चाळीस रुपये पगार ठरला होता. जेवणाच्या खर्चाचे म्हणून महिन्याला तीस रुपये त्या नातलगाला द्यायचे त्यानें कबूल केलें होतें. निदान दहा रुपये तरी आपण घरीं पाठवूं असें यशवंताला वाटत होतें. पण त्याचा नातलग त्याला आपल्याबरोबर हॉटेलमध्यें नेऊं लागला. आठवड्यांतून एकदा सिनेमालाही घेऊन जाई. यशवंताला तें नको होतें पण त्याला तसें म्हणतां येईना. त्याचे सगळे पैसे खर्च होऊं लागले. तेथें येऊन चार महिने झाले तरी तो घराकडे कांहींही पाठवूं शकला नाहीं. त्याला हळहळ वाटत होती. 'घरचीं माणसं जाऊं नको असं म्हणत असतां आपण आलों.

आपण आतां असेच परत गेलों तर तीं काय म्हणतील ?'
ह्या विचारानें त्याचें मन परत जायला तयार होत नव्हतें. पैसे पाठवितां आल्याशिवाय घरीं कांहीं कळवायचें नाहीं, असें त्यानें ठरविलें होतें. त्याचा मालक, "पगार वाढवतों," असं म्हणत होता. पगार वाढला म्हणजे तरी घरीं पैसे पाठवितां येतील ह्या आशेनें तो दिवस काढीत होता.

त्याचा पगार पांच रुपये वाढला. पण नंतर तो एकाएकीं आजारी पडला. पंधरा दिवस त्याला कामाला जातां आलें नाहीं. त्याच्या आजारीपणांत त्याच्या नातलगानें त्याच्याकरतां जादा पंधरा रुपये खर्च केले. त्याचे पगाराचे वीस-बावीस रुपये बुडले. त्याची फेड करण्यांत त्याचे सहासात महिने गेले.

'आपलीं माणसं कशीं जगत असतील ? तीं काय करीत असतील ? आपल्याकडे पाऊस झाला असेल का ? झाला असल्यास आपल्या शेतीची पेरणी वगैरे केली असेल का ? का बैल नाहींत म्हणून ती पड पडली असेल ? आपल्याकडचा पोळा ( बेंदराचा सण ) होऊन गेला असेल ? गांवांत काय काय घडलं असेल ?' अशी यशवंताला आपल्या घरची आणि गांवची सारखी आठवण होत होती. 'आपण आपल्या विहिरीवर मोट हाणीत आहोंत. भलरी घालीत ज्वारीची काढणी करीत आहोंत. आपला मुलगा खोंडाशीं खेळतो आहे.' अशीं त्याला स्वप्नं पडत होतीं. 'आपल्याला घरीं पैसे पाठवितां आले नाहींत; येत नाहींत. मग इथं राहून काय करायचं ?' असें त्याला वाटूं लागलें होतें. गांवाकडे परत जायची त्याच्या मनाला ओढ लागून राहिली होती.

नंतर पगार झालेल्या एका दिवशीं तो घरीं येत असतां, वाटेंत एके ठिकाणीं गर्दींत, त्याचा खिसा कापला गेला. त्याच्या पगाराचे सगळे पैसे गेले. ती तूट भरून काढण्यांत त्याला आणखी सहा सात महिने घालवावे लागले. त्यानंतर मात्र पगार होतांच आपल्या त्या नातलगाचे महिन्याच्या खर्चाचे पैसे देऊन तो तांतडीनें गांवीं जायला निघाला. गाडींत बसल्यावर आपण केव्हां एकदा घरीं पोहचूं, असें त्याला झालें. त्याला वाटलें, ही गाडी आपल्याला थेट आपल्या गांवांतून लागलीच शेतांतल्या आपल्या वस्तीवर घेऊन जाईल तर किती बरें होईल !

स्टेशनवर उतरतांच तो लगबगीनें आपल्या खेड्याकडे जायला निघाला. वाटेनें जातांना, ‘ आपलीं माणसं सगळीं खुशाल असतील ना ? ’ अशी त्याला उगीचच हुरहुर वाटत होती. झाडांच्या छत्र्या पांघरलेलीं आपल्या खेड्यांतलीं घरें दिसूं लागतांच, त्याला अतिशय आनंद झाला. गांवांतूनच त्याच्या वस्तीकडे वाट होती. तो गांवाजवळ गेला. गांवालगतचीं मांगांचीं घरं त्याला दिसलीं नाहींत. पलीकडे मोकळ्या जागेंत कांहीं नवीन टुमदार छपरीं घरें बांधलेलीं त्याला दिसलीं. गांवांतले रस्ते दुरुस्त झालेले त्यानें पाहिले. गांवांत त्याला कोठें घाण आढळली नाहीं. देवळाजवळ एक नवीन मोठी इमारत तयार होत आलेली होती. तो मनाशीं म्हणाला, “ दीड वर्षांत गांव किती सुधारलंय् आपलं ! ” त्याला गांवांत फारशीं माणसें आढळलीं नाहींत. गांवांतून तो वेशीजवळ गेला. वेशीबाहेरील पटांगणांत कसली तरी सभा भरली होती. गांवांतील सगळे लोक

तेथें जमले होते. सभेच्या कडेला त्याचा रंगा एका खुर्चीवर बसलेला त्याला दिसला. त्याला पाहून यशवंताला आनंद झाला. रंगाजवळ कोणीतरी एक बडा माणूस दुसऱ्या एका खुर्चीवर बसला होता. गुरुजी बोलत होते. यशवंता चकित होऊन तेथेंच थांबला आणि तें ऐकूं लागला.

" आपल्या रंगा पवाराचा, अधिक धान्य पिकविण्याच्या चढाओढींत जिल्ह्यांत पहिला नंबर लागला आहे. त्यानें एका एकरांत नव्वद मण ज्वारी पिकविली आहे. त्याला पांच हजार रुपयांचं बक्षिस मिळालं आहे, हें आपल्याला कळलं असेलच. त्याचा सत्कार करण्याकरतां आपण इथें जमलों, आहोंत. त्याचकरतां आपले जिल्हाधिकारी इथें आलेले आहेत. आपला रंगा एक तरुण मुलगा आहे. गत वर्षींच्या दुष्काळांत त्याचा थोरला भाऊ गांव सोडून गेला. घरची सगळी जबाबदारी त्याच्यावर पडली होती. ती पार पाडून त्यानें हें यश मिळवलं आहे. त्याचं कौतुक करावं तेवढं थोडंच होईल. यानें एवढंच केलेलं नाहीं. रात्रीच्या शाळेंत तो लिहा-वाचायला शिकला आहे. गांवांतील प्रत्येक सार्वजनिक कामांत त्यानें भाग घेतलेला आहे. अलीकडे त्यानें कोंबड्या पाळल्या आहेत. शेळ्या घेतल्या आहेत. हें यश मिळवून त्यानें आपलं, आपल्या गांवाचं नांव गाजवलं आहे. आपण त्याचा अभिमान बाळगला पाहिजे. रंगरावासारखंच आपण सर्वांनीं केलं तर, आपली, आपल्या गांवाची आणि देशाची भरभराट होईल. आपण तसं करूं या. " एवढें बोलून गुरुजी खालीं बसले, तें ऐकून आपण स्वप्नांत तर नाहीं ना असें



जिल्हाधिकारी

यशवंताला वाटलें. त्याचें मन भारावलें. त्याचे डोळे आनंदानें भरून वाहूं लागले. नंतर जिल्हाधिकारी उठून बोलूं लागले, "माझ्या शेतकरी बंधूंनो, मला आज इथें येण्यांत फार आनंद वाटला. गुरुजींनीं रंगाची माहिती सांगितली. ती ऐकून मला त्याचं कौतुक वाटलं. त्याचं मी अभिनंदन करतों. आपलीं खेडीं हा आपल्या देशाच्या पाठीचा कणा आहे. तो बळकट झाला पाहिजे. सरकार त्याकरतां प्रयत्न करीत आहेच. जमिनींना पाण्याचा पुरवठा करतां यावा म्हणून सरकारनें मोठमोठीं धरणं बांधायला सुरुवात केली आहे. तीं बांधून झालीं म्हणजे हजारो एकर जमिनीला पाणीपुरवठा होऊं लागेल. सरकार शेतकऱ्यांना जास्तींत जास्त सवलती आणि मदत देत आहे. पण तुम्हीं खेड्यांतील जनतेनेंही त्याकरतां सरकारशीं सहकार्य करून कसून प्रयत्न करायला हवेत. तसे ते केलेत तर तुम्हांला सुख

आणि शांतता लाभेल आणि देशांदेशांतले वैरभाव नाहींसे करून जगांत शांतता निर्माण करण्याचं महान् कार्य आपल्या देशाला करतां येईल." त्यानंतर रंगा उठून म्हणाला, "मी अडाणी आहें. सभेंत बोलायचं मला ठाऊक नाहीं. मला हें जें सर्व करतां आलं तें गुरुजींनीं शिकवलं म्हणून. माझ्या यशाचे खरे धनी ते आहेत." सभा संपली. जिल्हाधिकारी जायला निघाले. त्यांना पोचवायला गुरुजी त्यांच्याबरोबर त्यांच्या मोटरीकडे गेले. यशवंता रंगाकडे जाऊन त्याला कडकडून भेटला. त्याला पाहातांच रंगाला अत्यंत आनंद झाला. ते भाऊ भाऊ मग आपल्या वस्तीकडे जायला निघाले.

वाटेंत रंगानें यशवंता गेल्यापासूनची आपली हकीकत त्याला सांगितली. यशवंतानें आपली त्याला सांगितली.

ते वस्तीवर पोहोंचले. वस्तीचें सगळें रूप बदललेलें होतें. गोठ्यावर टाकलेल्या पत्र्यांमुळें त्याला शोभा आली होती. गोठ्यापुढच्या पटांगणांत कोंबड्या चरत होत्या. शेळीचीं कोकरें बागडत होतीं. त्यांचीं सगळीं जनावरें गोठ्यांत होतीं. तीं आतां चांगलीं तयार दिसत होतीं. यशवंताला पाहातांच त्याच्या बायकोला गगनांत न मावण्याइतका आनंद झाला. त्याच्या आईनें त्याला मिठी मारली. त्याचा मुलगा त्याला बिलगला. आपल्या माणसांत मिसळतांच यशवंताला आनंदीआनंद झाला. तो आनंदानें गहिंवरून म्हणाला, "मीं मोठी चूक केली! ह्यापुढें कांहींही झालं तरी मी आपलं खेडं, आपली शेती सोडून कुठें जाणार नाहीं!"



ग्रंथालय शाखा
नों. दि.
१०००८८
२.१.९७
नों. दि. २१९९४